
पुढारी

**Pudhari -** 18 March 2017

# आदिवासींची अपूर्वा... दी



अपूर्वा आगवण

घर -दारी सगळं सुस्थितीत असताना उच्च शिक्षीत होण्याची क्षमता आणि पात्रता असूनही ऐशो आरामातलं जीवन सोडून तेही तरुण वयात आणि स्वतःला समाज कार्यासाठी वाहून घेणाऱ्या मुलीला आजच्या काळात कुणीही वेडेच म्हणेल. आदिवासींसाठी काम करणारी अशीच एक तिशीतील ध्येयवेडी तरुणी...... येऊरच्या आदिवासींची अपूदी...... अपूर्वा आगवण. ठाण्यातील प्रख्यात उद्योजक पुरुषोत्तम आणि भाग्यश्री आगवण यांची मुलगी. बारावीला ८० टक्के गुण मिळाल्यावर स्वतःच्या क्षमतेवर आणि घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे डॉक्टर, इंजिनिअर, संगणक क्षेत्रातील उच्च शिक्षणाची दारे सहज खुली होणं शक्य होतं. पण या मळलेल्या वाटेने जाणं सहज शक्य असूनही अपूर्वा त्या वाटेकडे वळली नाही. खरे तर तिला ठाण्याच्या नामांकित महाविद्यालयात मायक्रो बायोलॉजीला प्रवेश मिळाला होता. पण ते शिक्षण सोडून तिची मूळ आवड असलेल्या शास्त्रीय संगीत शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले. त्यासाठी चक्क तिने ८ वर्ष दिली. वडिलांची ही संगीताची आवड तिच्याकडे वारसा म्हणून आली. त्यामुळे तिच्या या संगीत शिक्षणाला विरोध केला नाही. तिने भारतीय शास्त्रीय संगीत शिकता - शिकता पाश्च्यात्य संगीताचा अभ्यास बांद्राच्या एका संगीत विद्यालयात सुरु केला. पाश्चात्य आणि भारतीय संगीताचं मिलाफ असलेले फ्युजन तयार करण्यात तिला रस होता.

त्याच दरम्यान वडिलांसोबत तिने चांदणं दिसाचं हा अल्बमही काढला. संगीत विद्यालयात शिकवणाऱ्या ग्लेन सरांशी तिची ओळख झाली. कोणताही विषय मुळात जाऊन आणि सोपा करून कसा शिकवायचा यासाठी ग्लेन सर विविध अभ्यासपद्धती विकसित करत. संगीतही ते याच पद्धतीने शिकवत. ग्लेन सरांच्या कार्यात अपूर्वा सहभागी झाली. पण हे काम करत असतानाच तिने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी. ए. चे शिक्षण घेतले. समाजकाम करताना येणाऱ्या अडचणी या मूळ शासन दरबारातील कार्यपद्धतीमुळे येतात. त्यामुळे शासन समजून घेण्यासाठी तिने मास्टर्स इन पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन यातही पदविका घेतली. शाश्वत विकास (सस्टेनेबल डेव्हलपमेंट) ही पदवी तिने अमेरिकेत घेतली. समाजकार्याचा अनुभव आणि त्यातलं शिक्षण आणि ग्लेन सरांसारखे मार्गदर्शक यातून क्रायसिस फाऊंडेशनची उभारणी झाली. फाऊंडेशनचे काम आदिवासी भागासाठी करण्याचे ठरले. पण त्याआधी अपूर्वा आणि तिच्या सहकाऱ्यांनी भारतातल्या आदिवासी पट्ट्यात भ्रमंती केली, त्यांची संस्कृती, त्याचे प्रश्न जाणून घेतले. नागालँड, मणिपूरसारख्या राज्यातल्या नक्षलग्रस्त भागात जाऊन काही काळ तिथे राहिली. दिल्लीतही तिने काही काळ काम केले. त्यानंतर महाराष्ट्रात आल्यावर प्रगती प्रतिष्ठानच्या सुनंदा पटवर्धन यांचे तिने मार्गदर्शन घेतले. त्यातून क्रायसिस फाऊंडनेशनच्या माध्यमातून २०१४ मध्ये तिने येऊरच्या आदिवासींसाठी काम सुरु केले. त्यासाठी तिचे आजोबा दत्तकेशव साठे यांनी त्यांच्या आनंताश्रम या संस्थेची जागा दिली. या जागेत शिक्षण अर्धवट सोडलेल्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील आदिवासी मुलींना संगणकाचे प्रशिक्षण देण्यास सुरवात केली. या प्रशिक्षणातून तयार झालेल्या मुलींना रोजगार म्हणून विविध प्राचीन पोथ्यांच्या डिजिटलायलेझशनचे काम देण्यात येते. विद्यावेतन म्हणून ५ हजार रुपये या विद्यार्थीनींना दिले जाते. या कामात २०१४ मध्ये ठाणे आणि पालघर जिल्ह्यातल्या मुली सहभागी होत्या. पण या मुलींच्या निवासाचा प्रश्न आला. तसेच संस्थेच्या कामात क्लारा, बाबरा बिंद्रा,ग्लेन यासारखे परदेशी कार्यकर्ते पहिल्यापासूनच कार्यरत होते. पण ही गोरी माणसे संस्थेच्या नावावर धर्मांतर करतात, असा आरोप झाला. त्या विरोधात रान पेटवणाऱ्यांना संस्थेने संयमाने आणि चोख उत्तरं दिली. पण त्यातून संस्थेचा पाया पक्का झाला. आज संस्थेत येऊरमधील १५ मुली कार्यरत आहेत. येऊरमधील काही मुले संगणक शिकण्यासाठी संस्थेत येतात. ठाण्यातील काही कंपन्यांमधून असेंब्लीगची कामे मिळवून आदिवासी महिलांना दिली जातात. संस्थेत येणाऱ्या मुलींना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यात आला आहे. या मुलीच्या शिक्षणाचा खर्च आणि आरोग्याचा काही तक्रारी असल्यास त्याचा खर्चही संस्था करते. संगणक प्रशिक्षणासाठी संगणक कमी पडत आहेत. त्यामुळे रोटेशन पद्धतीने मुलींना शिक्षण अपूर्वा आणि तिचे सहकारी देत आहेत. आदिवासींसोबत काम करताना त्यांच्या इतर प्रश्नावरही अपूर्वाने लक्ष केंद्रित केले आहे. जातीचा दाखला मिळविणे हे आदिवासींसाठी दिव्यच. त्यांच्या अज्ञानाचा फायदा दलाल घेतात. त्यामुळे संस्थेत येणाऱ्या मुलींना कागदपत्राची पूर्तता कशी करायची याचे मार्गदर्शन संस्थेने केले. या मुलीच आता स्वतः आपल्या जातबांधवाचे दाखले संस्थेच्या माध्यमातून काढून देत आहेत. केवळ दाखलेच नाही तर सरकार दरबारी कोणत्याही कामासाठी अर्ज कसा करायचा, त्याचा पाठपुरावा कसा करायचा हे सगळं या मुली शिकत आहे. मध्यतंरी येऊर परिसरात वीज नव्हती. त्याचा पाठपुरावा या मुलींनी केला. अशा या कार्यकर्त्या घडविण्याचे काम सुरु आहे. आदिवासींचे केवळ शिक्षणाच्या माध्यमातून सक्षमीकरण करणं एवढंच संस्थेचा उद्देश नाही तर त्यांच्या समस्यांवरही अपूर्वा आणि तिचे सहकारी काम करतात. वनविभाग आणि आदिवासींचा मध्यंतरी सरपणावरून संघर्ष पेटला होता. त्या प्रश्नातही संस्थेने वनविभागाशी चर्चा केली. श्रमजीवी संघटनेच्या सहकार्याने आदिवासींना न्याय मिळवून दिला. आदिवासीना वनपट्टे, सामूहिक वनपट्टे मिळवून देण्यासाठी सध्या अपूर्वा कायदेशीर लढाई लढत आहे. या सगळ्या नियमित कामाबरोबरच अपूर्वा सध्या व्हेंटिलेटर चेअर या महत्वाच्या विषयावर काम करत आहे. ग्रामीण भागात सर्पदंश झाल्यावर आदिवासींना वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. यासाठी संस्थेने एक व्हेंटिलेटर चेअर विकसित केली आहे. सर्पदंश झालेली व्यक्ती लवकरात लवकर उपचारापर्यंत पोहचू शकेल अशी या चेअरची रचना आहे. त्या चेअरचे पेटंटही संस्थेने मिळविले आहे. सर्पदंशाने होणारे मृत्यू थांबावेत, सर्पदंश झालेल्यांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी चेअरचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन व्हावे याकरिता अपूर्वाने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिकाही दाखल केली आहे. या याचिकेची सुनावणी करताना उच्च न्यायालयाने या व्हेंटिलेटर चेअरची दखल घेण्याचे आदेश दिले आहेत. या चेअरच्या उत्पादनात आयआयटीसारखी संस्था तांत्रीक मदत करत आहे. लवकरच या चेअरचे उत्पादन सुरु करण्यात येणार आहे. त्यापासून मिळणाऱ्या रोजगारातही आदिवासी महिलांना सामावून घेण्यात येणार आहे. आदिवासीसाठी सायकल लायब्ररी ही अपूर्वाने सुरु केली आहे. संस्थेचा हा खर्च अपूर्वा आणि तिचे सहकारी सॉफ्टवेअर विकसित करून त्याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून चालविला जातो.



भविष्यात आदिवासींना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळवण्यासाठी प्रकल्प राबविण्याचा अपूर्वाचा मानस आहे. या सगळ्या प्रवासात आई - वडिलांनी ठेवलेल्या विश्वासामुळेच मी हे काम करू शकले, असे आई - वडिलांप्रतीचे ऋण ती व्यक्त करते. त्याबाबत बोलताना ती म्हणते, हे सर्व करण्यासाठी आई - बाबांनी साथ दिलीच, विश्वास ठेवला, सुरुवातीला वैचारिक मतभेद झाले. पण आता तेही नाहीत. उलट बाबांनी घराचा एक भाग माझ्या कामासाठी खुला करून दिला आहे. अपूर्वाचा भाऊ अमेरिकेत स्थायिक झाला आहे. वडील त्यांचा उद्योग सांभाळण्यासाठी तिला आग्रह करत आहेत. पण अपूर्वा सध्या तरी त्याबाबत विचार करत नाहीत. हेच काम पुढे नेण्याचा तिचा विचार आहे. ऐशोरामाचे जीवन सोडून वेगळ्या वाटेने चालणाऱ्या आदिवासींच्या या अपूर्वादीच्या कार्याला सलाम.

–अनुपमा गुंडे